महावितरण

# महावितरण विद्युत वार्ता

■ वर्ष : १८ ■ अंक : २२ ■ मार्च २०२५ ■ पाने : ८

# अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमुळे महावितरणचा सन्मान

## हितगुज



**लोकेश चंद्र**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** यांच्या नेतृत्वात महावितरण गेल्या अडीच वर्षात परिवर्तन करत आहे. मा. देवेंद्र फडणवीस यांनी ३० जून २०२२ रोजी ऊर्जा खात्याची सूत्रे हाती घेतल्यापासून राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात क्रांतिकारी बदल होत आहेत. या परिवर्तनाचे अनेक पैलू आहेत. अक्षय ऊर्जेवर भर देऊन ऊर्जा खरेदीचा खर्च कमी करणे व त्याचवेळी पर्यावरण रक्षणाला हातभार लावणे. शेतकऱ्यांना आणि घरगुती ग्राहकांना कायमस्वरूपी दिलासा देतानाच औद्योगिक ग्राहकांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा कमी करणे. महावितरणच्या पायाभूत सुविधांचा विकास करतानाच अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून कार्यक्षमता वाढविणे, अशा अनेक बाबींचा उल्लेख करता येईल.

मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महावितरणमध्ये व्यापक बदल होत आहेत आणि त्या बदलांचा केंद्रबिंदू सर्वसामान्य वीज ग्राहक आहे. याचा परिणाम म्हणून महावितरणला चालू आर्थिक वर्षात तब्बल २५ राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

### शेतकऱ्यांच्या सेवेमुळे महावितरणचा गौरव

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही योजना म्हणजे शेतकऱ्यांच्या हितासाठी महावितरणने राबविलेली आतापर्यंतची सर्वात महत्त्वाची योजना आहे. विकेंद्रीत स्वरूपात सौर ऊर्जा निर्मिती केंद्रे तयार करून कृषी फीडर्सचे सौर ऊर्जीकरण करण्याची ही जगातील सर्वात मोठी योजना आहे. यामुळे शेतकऱ्यांना पंपासाठी दिवसा वीजपुरवठा होणार आहे. त्याचबरोबर वीजखरेदीच्या खर्चात कपात झाल्यामुळे उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा कमी करता येईल. आगामी वर्षात या योजनेतील सर्व सोलर पार्क उभे राहतील आणि शेतीसाठी शंभर टक्के सौर ऊर्जेचा वापर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरेल. या योजनेला 'इंडिया स्मार्ट ग्रीड फोरम'चा 'मोस्ट इनोव्हेटीव्ह रिन्युएबल एनर्जी प्रोजेक्ट' पुरस्कार मिळाला. त्याच प्रमाणे अत्यंत प्रतिष्ठेच्या स्कोच ॲवॉर्ड सोहळ्यात 'गोल्ड ॲवॉर्ड' मिळाला. या योजनेसाठी टेक्नो कमर्शिअल गटात आयपीपीएआयतर्फे 'डिसेंट्रलाईज्ड सोलर पॉवर सिस्टिम ॲवॉर्ड २०२५' ने महावितरणला सन्मानित करण्यात आले. तसेच आयएसजीएफतर्फे 'मोस्ट इनोव्हेटीव्ह रिन्युएबल एनर्जी प्रोजेक्ट्स इन इंडिया' हा पुरस्कारही महावितरणला या योजनेसाठी मिळाला.

मा. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एप्रिल २०२३ मध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेचा शुभारंभ झाला. अतिरिक्त मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांच्या मार्गदर्शनात राज्याचा ऊर्जा विभाग, महसूल विभाग व महावितरण संयुक्तपणे या योजनेची अंमलबजावणी करत आहेत. केवळ दीड वर्षात राज्यात १४,९०० मेगावॅटच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांची उभारणी चालू आहे. त्यापैकी अनेक प्रकल्प पूर्ण होऊन शेतकऱ्यांना त्याचा लाभही होऊ लागला आहे. गतिमान आणि पारदर्शी अंमलबजावणी हे या योजनेचे वैशिष्ट्य आहे. त्यासाठी अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करण्यात आला आहे. या योजनेसाठी सर्वंकष पोर्टल तयार केल्याबद्दल महावितरणला 'गव्हर्नन्स नाऊ' या प्रकाशनातर्फे 'पीएसयू ॲवॉर्ड' देण्यात आला. योजनेच्या सफल अंमलबजावणीसाठी आयपीपीएआयने विशेष मान्यता पुरस्कार दिला.

### अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील कार्याचा सन्मान

मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या वर्षी फेब्रुवारी २०२४ मध्ये सर्वसामान्य वीज ग्राहकांसाठी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरु केली. महिना तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे, यासाठी ही योजना आहे. त्यासाठी केंद्र सरकारतर्फे ग्राहकांना थेट अनुदान दिले जाते. राज्यात या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महावितरण नोडल एजन्सी आहे. महावितरणला इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे 'नॅशनल ॲवॉर्ड फॉर रिमार्केबल परफॉर्मन्स इन द सोलर रूफ टॉप स्कीम २०२४' मिळाला. त्याचबरोबर आयपीपीएआयचा 'एनर्जी कॉन्झर्वेशन ॲवॉर्ड २०२५' महावितरणला मिळाला. प्रतिष्ठेच्या स्कोच ॲवॉर्ड पुरस्कार सोहळ्यात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंतर्गत अंमलात आणलेल्या सौर ग्राम योजनेसाठी महावितरणला सिल्व्हर ॲवॉर्ड मिळाला.

महावितरणने अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रात मोठे काम केले आहे. आगामी काळात महावितरणतर्फे होणाऱ्या वीजखरेदीत मोठा वाटा अपारंपरिक ऊर्जेचा असेल. त्यामुळे किफायतशीर दरात वीज उपलब्ध होणार असून महावितरणला ग्राहकांच्या वीजदरात कपात करण्याचा प्रस्ताव मांडणे शक्य झाले. मला अभिमान वाटतो की, महावितरणला 'ऑल इंडिया रिन्युएबल एनर्जी असोसिएशनचा एक्झंप्लरी कॉन्ट्रिब्युशन टू द ॲडॉप्शन ॲंड प्रमोशन ऑफ रिन्युएबल एनर्जी ॲवॉर्ड २०२४' मिळाला. त्याचप्रमाणे इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सचा राज्य पातळीवरील 'एनर्जी ट्रान्झिशन ॲवॉर्ड' मिळाला. अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रामध्ये बॅटरी स्टोरेजचे खूप महत्त्व आहे. महावितरणला आयपीपीएआयतर्फे 'डिस्ट्रिब्युटेड बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टिम ॲवॉर्ड २०२५' मिळाला.

### वीज ग्राहकांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

वीज ग्राहक हा महावितरणच्या कामाचा केंद्रबिंदू आहे. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून ग्राहकांसाठी सुविधा निर्माण करण्यात महावितरणने पुढाकार घेतला आहे. त्यासाठी महावितरणला गौरविण्यात आले आहे. नुकताच महावितरणला महापॉवर पे ही वीजबिल भरण्यासाठीची सुविधा विकसित केल्याबद्दल 'पेमेंट सिक्युरिटी ॲवॉर्ड २०२५' मिळाला. ग्राहकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी केलेल्या विशेष कामगिरीसाठी महावितरणला आयपीपीएआयतर्फे 'बेस्ट डिस्ट्रिब्युशन कंपनी ॲवॉर्ड २०२५' ने गौरविण्यात आले. सध्या सायबर गुन्ह्यांच्या अनेक घटना ऐकण्यात येतात. वीज ग्राहकांचे सायबर गुन्हेगारांपासून रक्षण करण्यासाठी आणि ग्राहकांची माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी महावितरणने केलेल्या कामगिरीबद्दल कंपनीला गव्हर्नन्स नाऊच्या वेस्ट टेक

(उर्वरित मजकूर पान क्र. ६ वर)

# ऊर्जा विभागाच्या १०० दिवसांच्या प्रगती पुस्तकाचे प्रकाशन



ऊर्जा विभागाच्या १०० दिवसांच्या प्रगती पुस्तकाचे प्रकाशन मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मा.राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र (महावितरण), संजीवकुमार (महापारेषण) व राधाकृष्णन बी. (महानिर्मिती), उद्योग सचिव पी. अनबलगन, मुख्यमंत्र्यांच्या सचिव अश्विनी भिडे, मराविमं सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, आशिष चंदराणा आणि नीता केळकर, वित्त संचालक अनुदीप दिघे व मान्यवर.

**मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** यांनी मुंबई येथे १०० दिवसांच्या आराखड्यानुसार ऊर्जा विभागाअंतर्गत महावितरण, महानिर्मिती, महापारेषण व महाऊर्जा या कंपन्यांनी केलेल्या कामगिरीच्या प्रगती पुस्तकाचे प्रकाशन केले.

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आगामी २५ वर्षांच्या राज्याच्या वाटचालीच्या अनुषंगाने ऊर्जा क्षेत्रातील गरजा पूर्ण करण्याची योजना निश्चित केली आहे. त्यानुसार १०० दिवसांच्या आराखड्यात वीजविषयक सार्वजनिक कंपन्यांसाठी विविध उद्दिष्टे ठरविण्यात आली होती. त्यांची माहिती व ती किती पूर्ण झाली याचा लेखाजोखा देणारे 'हंड्रेड डेज फॉर ट्वेंटी फाईव्ह इयर्स' हे प्रगती पुस्तक स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांनी लिहिले आहे. मराविमं सूत्रधारी कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीवेळी पुस्तकाचे प्रकाशन झाले.

## प्रकाशगड मुख्यालयाच्या प्रशासकीय इमारतीच्या छतावरील सौर ऊर्जा प्रणालीचे उद्घाटन





सौर ऊर्जा प्रणालीचे उद्घाटन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचे हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी संचालक अरविंद भादिकर (संचालन तथा मानव संसाधन), प्रसाद रेशमे (प्रकल्प), अनुदीप दिघे (वित्त), योगेश गडकरी (वाणिज्य)

**प्रकाशगड मुख्यालयाच्या** प्रशासकीय इमारतीच्या छतावरील सौर ऊर्जा प्रणालीचे उद्घाटन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या हस्ते करण्यात आले. प्रकाशगड मुख्यालय हे आता सौरऊर्जेद्वारे प्रकाशमान झाले आहे. प्रकाशगड मुख्यालयाची दैनंदिन विजेची गरज भागविण्यासाठी २८० किलो वॅट क्षमतेची सौर ऊर्जा प्रणाली आस्थापित करण्यात आली आहे. याप्रसंगी संचालक अरविंद भादिकर (संचालन तथा मानव संसाधन), प्रसाद रेशमे (प्रकल्प), अनुदीप दिघे (वित्त), योगेश गडकरी (वाणिज्य), कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर (प्रकल्प) व परेश भागवत (मानव संसाधन) यांची उपस्थिती होती. कंत्राटदार में टेक फोर्स सर्व्हिसेस नागपूर यांनी या प्रकल्पाची उभारणी केली आहे.

## 'सर्वोत्कृष्ट वीज वितरण कंपनी' पुरस्काराने सन्मानित




अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी हा पुरस्कार स्वीकारला समवेत कार्यकारी संचालक (वितरण) दत्तात्रय पडळकर

**नवी दिल्ली** येथे केंद्रीय सिंचन व ऊर्जा मंडळातर्फे (सीबीआयपी) सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारी वीज वितरण कंपनी म्हणून महावितरणला गौरविण्यात आले. तर अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना ऊर्जा क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल पुरस्कार देण्यात आला.अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी कार्यकारी संचालक (वितरण) दत्तात्रय पडळकर उपस्थित होते.

# राज्याची विजेची गरज जर्मनीपेक्षा अधिक होणार, ऊर्जा परिवर्तनासाठी महाराष्ट्र सज्ज

## अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांचे प्रतिपादन



▸▸ आशियाई विकास बँकेतर्फे (एडीबी) महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राचे सौरऊर्जीकरण या विषयावर आयोजित एक दिवसाच्या चर्चासत्रात मार्गदर्शन करताना अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला.

**आर्थिक प्रगतीमुळे** २०३० पर्यंत महाराष्ट्र राज्याची विजेची गरज युरोपातील जर्मनी, स्पेन, इटली अशा प्रगत देशांपेक्षा जास्त असेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात ३.३ लाख कोटी रुपये गुंतवणुकीचा राज्याचा ऊर्जा परिवर्तन आराखडा तयार करण्यात आला असून भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी महाराष्ट्र सज्ज आहे, असे प्रतिपादन अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी मुंबईत केले.

आशियाई विकास बँकेतर्फे (एडीबी) महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राचे सौर ऊर्जीकरण या विषयावर आयोजित एक दिवसाच्या चर्चासत्राचे उद्घाटन करताना आभा शुक्ला बोलत होत्या. यावेळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र आणि एडीबीच्या ऊर्जा संचालक डॉ. सुजाता गुप्ता उपस्थित होते.

आभा शुक्ला म्हणाल्या की, महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलिअन डॉलर्सची करण्यासाठी आगामी पाच वर्षात राज्याचा आर्थिक विकास झपाट्याने होईल व त्यासोबतच राज्याची विजेची गरज मोठ्या प्रमाणात वाढेल. भविष्यातील आव्हाने ध्यानात घेऊन राज्याची सध्याची ४२ हजार मेगावॅटची क्षमता २०३० साली ८१ हजार मेगावॅटवर नेण्यासाठीचा ऊर्जा परिवर्तन आराखडा तयार करण्यात आला आहे. राज्याची ऊर्जा क्षमता वाढविताना नवीकरणीय ऊर्जेवर भर दिल्यामुळे पर्यावरण रक्षणाला मदत होण्यासोबतच किफायतशीर दरात वीज उपलब्ध झाल्यामुळे विजेचा खर्चही मोठ्या प्रमाणात कमी होईल.

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या कामांना वेग द्या

## अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांचे निर्देश



▸▸ वरखेडी येथील सौर ऊर्जा प्रकल्पाची पाहणी करताना अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांचे समवेत सहसचिव (ऊर्जा) नारायण कराड, मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, विशेष कार्य अधिकारी (ऊर्जा) संतोष सांगळे यांच्यासह अधिकारी.

**शेतकऱ्यांना** दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी राज्य शासनातर्फे महावितरणच्या माध्यमातून मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ची अंमलबजावणी सुरू आहे. या योजनेतील प्रकल्पांची कामे दर्जेदार व वेगाने पूर्ण करा, असे निर्देश अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी दिले.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मध्ये फुलंब्री तालुक्यातील वरखेडी येथे ६ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. या प्रकल्पातून आळंद व बोरगावमधील ६५० शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळत आहे. या प्रकल्पास अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना या महत्वाकांक्षी योजनेच्या कामासंदर्भात सूचना दिल्या.

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत

# यवतमाळ जिल्ह्यातील पहिला सौरऊर्जा प्रकल्प सावरगाव येथे कार्यान्वित

**मुख्यमंत्री** सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत जिल्ह्यातील पहिला सौर प्रकल्प कळंब तालुक्यातील सावरगाव (परसोडी) येथे मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांच्या हस्ते कार्यान्वित करण्यात आला. या ३ मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पातून ३३ केव्ही सावरगाव (परसोडी) उपकेंद्रातून निघणाऱ्या ०३ कृषी वीज वाहिनीवरील २५ गावातील १०४६ शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा मिळणार आहे. प्रकल्पाचे काम जलद गतीने पूर्ण करण्यासाठी अधीक्षक अभियंता प्रविण दरोली, कार्यकारी अभियंता पुरुषोत्तम चव्हाण, शशांक पोंक्षे, उपकार्यकारी अभियंता मांगीलाल राठोड, सागर डेकाटे, सुहास मेश्राम, सावरगावचे सरपंच शशिकांत देशमुख यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली.

# विधी सेवा महाशिबिरात सहभाग

**पुणे जिल्हा** विधी सेवा प्राधिकरणाच्या पुढाकारातून सासवड (जि. पुणे) येथे आयोजित विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय योजनांच्या महामेळाव्यात सासवड विभागाने सहभाग नोंदवला. अभय योजना, प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, मागेल त्याला सौर कृषीपंप योजना, लकी डिजिटल ग्राहक योजना आदींची माहिती नागरिकांना दिली. यासाठी अतिरिक्त कार्यकारी अभियंता नितीनकुमार पवार, उपकार्यकारी अभियंता गणेश चांदणे व अविनाश वाघमारे, सहायक अभियंता विक्रमसिंह घोरपडे व दीपाली जगताप, कनिष्ठ अभियंता तनुजा नाळे, उच्चस्तर लिपिक अजितकुमार नाईकनवरे आदींनी परिश्रम घेतले.

# लाईनमन दिवस उत्साहात साजरा

**राज्यातील घरे,** उद्योग, व्यवसाय, कृषी क्षेत्राला अखंडित व दर्जेदार वीजपुरवठ्यासाठी ऊन-वारा-पावसाची तमा न बाळगता जीवाची बाजी लावून परिश्रम घेणाऱ्या जनमित्रांच्या सेवेचा गौरव दिवस म्हणून सर्व परिमंडल कार्यालयातंर्गत ४ मार्च लाईनमन दिवस विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. जनमित्रांना 'विद्युत सेवेतील कणा', 'प्रकाशदूत' या बिरुदांनी पुन्हा गौरविले गेले. शून्य वीज अपघाताचा मूलमंत्र जपून सेवा बजाविताना सुरक्षेची काळजी घेण्याबाबत जनमित्रांना आवाहन करण्यात आले.



**चंद्रपूर परिमंडल** : चंद्रपूर परिमंडलात मुख्य अभियंता हरीश गजबे यांनी जनमित्रांना शुभेच्छा देताना चंद्रपूर, गडचिरोलीच्या आव्हानात्मक भौगोलिक परिस्थितीत सेवा बजावून जनतेच्या जीवनात प्रकाश पोहचविणाऱ्या जनमित्रांचा सार्थ अभिमान असल्याचे गोरवोद्गार काढले. महावितरण व ग्राहक यांच्यातील महत्वाचा दुवा आहात, तुमच्या परिवाराचा तुम्ही आधार आहात, काम करताना सुरक्षेशी तडजोड करू नका, असे आवाहन जनमित्रांना केले.



**कोल्हापूर परिमंडल** : लाईनमन हा महावितरणचा कणाच नाही तर आत्मा देखील आहे, असे प्रतिपादन मुख्य अभियंता स्वप्नील काटकर यांनी केले. विद्युत वाहिनीवर काम करताना स्वतःच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे ,असे सांगितले. याप्रसंगी प्रमुख पाहूणे महेंद्र कुलकर्णी, अधीक्षक अभियंता गणपत लटपटे, पुनम रोकडे, सहाय्यक महाव्यवस्थापक शशिकांत पाटील, विजय गुळदगड यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच कार्यकारी अभियंते अभिजीत सिकनीस, प्रशांतकुमार मासाळ, सुधाकर जाधव, सुनील माने, दत्तात्रय भणगे, दीपक पाटील यावेळी उपस्थित होते.

**अमरावती परिमंडल** : अमरावती परिमंडलात रक्तदान शिबिर, मोटर सायकल रॅली, क्रीडा स्पर्धा व सुरक्षा किटचे वाटप अशा विविध उपक्रमांनी लाईनमन दिन साजरा करण्यात आला. मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नियोजनात अधीक्षक अभियंता दीपक देवहाते, प्रवीण दरोली, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे, कार्यकारी अभियंते अनिरुद्ध आलेगावकर, संजय सराटे, विजयकुमार कासट, संजय कुटे, नरेंद्र कटारे, पुरुषोत्तम चव्हाण, ब्रजेश गुप्ता, जनार्दन चव्हाण यांनी पुढाकार घेतला.



**जळगाव परिमंडल** : वीज यंत्रणेवर काम करणाऱ्या प्रत्येक जनमित्रांने सुरक्षा साधनांचा जबाबदारीपूर्वक वापर केल्यास निश्चितपणे जळगाव परिमंडल विद्युत अपघातशून्य होईल, अशी अपेक्षा व्यक्त करून नवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून जनमित्रांसाठी येणारा काळ नवीन संधी घेऊन येईल, अशा शुभेच्छा मुख्य अभियंता आय.ए. मुलाणी यांनी दिल्या. मंचावर अधीक्षक अभियंता अनिल महाजन, योगा शिक्षिका डॉ. अनिता पाटील, गणीभाई मेमन, अशोक केदारे उपस्थित होते.

**नांदेड परिमंडल** : नांदेड परिमंडलात आयोजित कार्यक्रमात मुख्य अभियंता राजाराम माने यांच्या हस्ते जनमित्रांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अधीक्षक अभियंता सुधाकर जाधव, सहायक महाव्यवस्थापक (मासं) प्रदीप सातपुते यांच्यासह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



**अकोला परिमंडल** : लाईनमन हे महावितरणचा आधारस्तंभ असल्याचे प्रतिपादन मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी केले. याप्रसंगी अधीक्षक अभियंता अजितपालसिंह दिनोरे, यामिनी पिंपळे, सहायक महाव्यवस्थापक मनीषकुमार भोपळे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अरुण शेलकर, नितीन मेश्राम, वरिष्ठ तंत्रज्ञ वंदना देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

**पुणे परिमंडल** : पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील तांत्रिक कर्मचाऱ्यांसाठी गणेशखिंड येथील विश्रामगृहाच्या प्रांगणात लाईनमन दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मुख्य अभियंता राजेंद्र पवार म्हणाले की, ग्राहकांना तत्पर वीजसेवा देणारे जनमित्र हे महावितरणचा कणा आहेत. 'वीजयंत्रणेत काम करताना आमची आठवण ठेऊन सुरक्षा साधनांचा प्रत्येकवेळी वापर करा' असे गलबलून सांगणाऱ्या मुलामुलींचे आवाहन सर्वांच्या मनात घर करून गेले. आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी अधीक्षक अभियंता युवराज जरग, सिंहाजीराव गायकवाड, रवींद्र बुंदेले, सहायक महाव्यवस्थापक माधुरी राऊत (वित्त) व शीतल निकम (मासं), उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भूपेंद्र वाघमारे उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. संतोष पाटणी यांनी केले. वैद्यकीय उपक्रमांसाठी पुरंदर ब्लड बँक, केके आय इन्स्टिट्यूट यांनी सहकार्य केले.

**भांडुप परिमंडल** : परिमंडलातील कोलशेत उपविभागात मुख्य अभियंता सुनील काकडे यांच्या उपस्थितीत आयोजित कार्यक्रमात जनमित्रांचा सन्मान करण्यात आला. तणावमुक्त जीवन तसेच आहार आणि आरोग्य या विषयावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन झाले. तर ठाणे मंडलात इटर्निटी उपकेंद्रात अधीक्षक अभियंता जितेंद्र फुले यांनी आर्थिक नियोजन या विषयावर मार्गदर्शन केले.



**कल्याण परिमंडल** : ऊन, वारा, पाऊस, नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती तसेच इतरही अनेक प्रसंगात अत्यंत खडतर परिस्थितीत ग्राहकांच्या सुरळीत वीजपुरवठ्यासाठी जनमित्र अखंडित सेवा देतात. किंबहुना त्यांच्या हाती राज्याच्या प्रगतीची धुरा असल्याचे गौरवोद्गार सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांनी व्यक्त केले.

यावेळी मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा, अधीक्षक अभियंता दीपक पाटील, दिलीप भोळे, मोहन काळोगे यांची प्रमुख उपस्थिती होती. जगदाळे म्हणाले की, जनमित्रांनी त्यांच्या दैनंदिन कामकाजात सुरक्षा, स्वाभिमान आणि सेवा हे ब्रीद पाळण्याची आवश्यकता आहे. त्यांनी आपल्या कामातून गणवेशाचा सन्मान वाढवावा. आपली पुढची पिढी डोळ्यासमोर ठेवून कामाच्या वेळी सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन त्यांनी जनमित्रांना केले.

प्रारंभी लघू प्रशिक्षण केंद्राच्या आवारात उभारलेल्या 'लाईनवुमन' पुतळ्याचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. कल्याण पूर्व विभागाकडून आयोजित रक्तदान शिबिरात ४८ रक्त बाटल्यांचे संकलन झाले.



**नाशिक परिमंडल** : ग्राहकांना गुणवत्तापूर्ण सेवा देत असताना स्वतःची सुरक्षा देखील महत्वाची असल्याचे प्रतिपादन नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांनी केले. नाशिक परिमंडलात आयोजित जनमित्रांच्या सत्कारप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा) दत्तात्रय बनसोडे, अधीक्षक अभियंता ज्ञानदेव पडळकर, सहायक महाव्यस्थापक महेश बुरंगे उपस्थित होते.

मुख्य महाव्यवस्थापक दत्तात्रय बनसोडे यांनी, तांत्रिक कर्मचाऱ्यांनी विद्युत यंत्रणेवर काम करताना आपल्या सुरक्षेसाठी आर्थिंग रॉड अत्यंत महत्त्वाचा आहे. तसेच कर्तव्यावर नेहमीच खाकी गणवेश परिधान करून त्याचा अभिमान बाळगला पाहिजे असे सांगितले.

यावेळी सर्व जनमित्रांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी विकास आढे तर सूत्रसंचालन व्यवस्थापक मंगेश गाडे यांनी केले. आभार अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रशांत चव्हाण यांनी मानले.



**लातूर परिमंडल** : वीज सेवेच्या क्षेत्रातील लाईनमन हा महावितरणचा चेहरा आहे, असे प्रतिपादन मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी केले. त्यांच्या हस्ते जनमित्रांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सहायक महाव्यवस्थापक चेतन वाघ, विद्युत निरीक्षक विष्णुकांत बिराजदार, कार्यकारी अभियंता गणेश सामसे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र चुनारकर यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रमोद कांबळे यांनी केले. आभार उपकार्यकारी अभियंता ज्योती कुमठेकर यांनी मानले.



**बारामती परिमंडल** : ग्राहकांना अखंडित वीज सेवा देण्यासाठी दुरुस्तीची कामे करताना जनमित्रांनी सुरक्षा साधनांचा सातत्याने वापर करावा, असे आवाहन महावितरण बारामती परिमंडलाचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांनी केले आहे. यावेळी अधीक्षक अभियंता दीपक लहामगे, सहायक महाव्यवस्थापक (मासं) धैर्यशील गायकवाड, कार्यकारी अभियंता संजय गायकवाड, म्हसू मिसाळ व संजय सोनवलकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्रीकृष्ण वायदंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# दिव्यांग कर्मचाऱ्यांना दुचाकींचे वाटप

**बारामती** येथे राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी परिमंडलातील ५ दिव्यांग कर्मचाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते दुचाकींचे वाटप करण्यात आले. कंपनीकडून दिव्यांग कर्मचाऱ्यांना विविध सवलती देण्यात येतात. यात अस्थिव्यंग दिव्यांग कर्मचाऱ्यांना दुचाकी देण्याची तरतूद आहे.

लाभार्थी दिव्यांग कर्मचाऱ्यांमध्ये व्यवस्थापक (विवले) आनंद गंजी, सहायक अभियंता सुरेश कुंभार, उप व्यवस्थापक (विवले) विनोद भोईटे, प्रधान यंत्रचालक संतोष पवार, शिपाई अनिल गंगावणे यांचा समावेश आहे. यावेळी कोकण विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंते राजेंद्र पवार, ज्ञानेश कुलकर्णी, सुनील काकडे, स्वप्नील काटकर, चंद्रमणी मिश्रा, ज्ञानदेव पडळकर, धर्मराज पेठकर, मुख्य महाव्यवस्थापक (मासं) भूषण कुलकर्णी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके, सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी ललित गायकवाड यांची उपस्थिती होती.

# नूतन मुख्य अभियंता यांचे अभिनंदन !


अंकुर हरी कावळे
वितरण कक्ष,
सांघिक कार्यालय, मुंबई


संजय शंकर पाटील
नवीकरणीय ऊर्जा,
सांघिक कार्यालय, मुंबई


संदीप सुरेश पाटील
वीज खरेदी कक्ष,
सांघिक कार्यालय, मुंबई


राजाराम बाबू माने
नांदेड परिमंडल


अरविंद उद्धवराव बुलबुले
लातूर परिमंडल


प्रशांत श्रीपतीराव दानोळीकर
देयके व महसूल कक्ष,
सांघिक कार्यालय, मुंबई


राजेश पिरालाल नाईक
अकोला परिमंडल


कल्पना संदीप पाटील
प्रकल्प कक्ष,
सांघिक कार्यालय, मुंबई


अशोक सीतारामजी साळुंके
सांघिक कार्यालय, मुंबई

## मुख्य अभियंता : बदली व पदस्थापना

| अधिकारी यांचे नाव | यापूर्वीचे ठिकाण | पदस्थापना ठिकाण |
|---|---|---|
| सुंदर शामराव लटपटे | लातूर परिमंडल | नाशिक परिमंडल |
| सुहास बाबुराव रंगारी | अकोला परिमंडल | गोंदिया परिमंडल |

# अखिल भारतीय विद्युत क्रीडा स्पर्धेत शरीरसौष्ठवात सर्वसाधारण विजेतेपद




▸▸ सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक स्विकारताना महावितरणचे कर्मचारी खेळाडू

**राजस्थान** कोटा येथे राजस्थान राज्य विद्युत उत्पादन मर्या. यांच्या यजमानपदाखाली संपन्न ४६ व्या अखिल भारतीय विद्युत क्रीडा स्पर्धेत शरीरसौष्ठव व पॉवरलिफ्टिंगमध्ये महावितरणच्या खेळाडूंनी चमकादार कामगिरी केली. शरीरसौष्ठवात सर्वसाधारण विजेतेपदावर नाव कोरले. शरीरसौष्ठवात सुनील सावंत (कल्याण परिमंडल), राहुल कांबळे, अमित पाटील (कोल्हापूर) यांनी विविध उंची गटात सुवर्णपदक पटकावले. नामदेव सावंत (कोल्हापूर) यांनी कांस्यपदक पटकावले. पॉवरलिफ्टिंगमध्ये विविध वजनगटात रवी मिरगणे सुवर्णपदक (छत्रपती संभाजीनगर), मनीष कोंड्रा (पुणे), स्वप्निल लिंबसरकर (भांडुप) यांनी रौप्यपदके व प्रसाद चव्हाण (भांडुप) यांनी कांस्यपदक पटकाले. विजेत्या खेळाडूंचे संचालक (संचालन तथा मानव संसाधन) अरविंद भादिकर यांनी अभिनंदन केले आहे. ❍❍❍

# साज्वी साळुंखेची सैनिक शाळेसाठी निवड



**साज्वी** स्मिता स्वप्नील साळुंखे हिची नुकतीच राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए) द्वारे घेण्यात येणाऱ्या अखिल भारतीय सैनिक शाळा प्रवेश पूर्व परिक्षेतून सैनिक शाळेसाठी निवड झाली आहे. तिला नेताजी सुभाष चंद्र बोस मिलिटरी अकॅडमी, सिल्वासा, दादरा नगर हवेली येथील शाळेत सहाव्या वर्गात प्रवेश मिळाला आहे. प्रकाशगड मुख्यालयात वरिष्ठ व्यवस्थापक (मासं) पदी कार्यरत डॉ. स्मिता बडे-साळुंखे यांची ती कन्या आहे. ❍❍❍

# कर्मचाऱ्यांच्या वारसांसाठी समुपदेशन शिबिर

**नागपूर परिमंडलात** मृत किंवा वैद्यकीय कारणास्तव मुदतपुर्व सेवानिवृत्ती घेतलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांसाठी अनुकंपा तत्वावर नियुक्ती किंवा अंतिम देयकाबाबत समुपदेशन शिबिर संपन्न झाले. या शिबिरात वारसांना त्यांचे दिवंगत कर्मचाऱ्यांच्या मृत्युनंतर मिळणाऱ्या विविध लाभाची, नोकरीकरिता असलेल्या निश्चित ज्येष्ठता क्रमांकाबाबत माहिती देण्यात आली. यावेळी मुख्य अभियंता दिलीप दोडके, सहायक महाव्यवस्थापक (मासं) महेश जाधव यांची उपस्थिती होती. शिबिर यशस्वीतेसाठी वरिष्ठ व्यवस्थापक (मासं) विवेक बन्हनोटे, उपव्यवस्थापक (मासं) अमित पेढेकर यांनी परिश्रम घेतले. ❍❍❍

(हितगूज : पान क्र. १ वरुन )

पुरस्कार सोहळ्यात 'सायबर सिक्युरिटी अँड डेटा प्रोटेक्शन अॅवॉर्ड २०२५' ने गौरविण्यात आले.

महावितरणने कार्यक्षमता वाढविण्यासाठी सातत्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. माहिती तंत्रज्ञानातील इंटरनेट ऑफ थिंग्जसारख्या तंत्राचा वापर करण्यात महावितरण आघाडीवर आहे. आपणा सर्वांसाठी आनंदाची बाब आहे की, सार्वजनिक उपक्रमांसाठीच्या राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यात महावितरणला वीज उपकेंद्रांच्या देखरेखीसाठी विकसित केलेल्या तंत्रज्ञानासाठी 'बेस्ट यूज ऑफ ऑटोमेशन अँड डिजिटल टेक्नॉलॉजीज अॅवॉर्ड २०२५' मिळाला. वीज उपकेंद्रांसाठी महावितरणने केलेल्या तंत्रज्ञानाच्या वापराबद्दल कंपनीला वेस्ट टेक पुरस्कार सोहळ्यात 'इमर्जिंग टेक्नॉलॉजी अॅडॉप्शन अॅवॉर्ड'ही मिळाला. याखेरीज 'टेक्नो कमर्शिअल अॅवॉर्ड २०२५' आणि 'बेस्ट स्टेट प्रमोशन ऑफ ईव्ही अॅवॉर्ड (प्रथम उपविजेते)' हे दोन पुरस्कार उल्लेखनीय आहेत.

आपली कंपनी देशातील सर्वात मोठी विद्युत वितरण कंपनी आहे. तीन कोटीपेक्षा अधिक ग्राहकांची सेवा महावितरण करते. कंपनीला यंदा बेळगावी येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात बेस्ट परफॉर्मिंग डिस्ट्रिब्युशन कंपनी म्हणून पुरस्कार मिळाला ही अभिमानास्पद बाब आहे. सेंट्रल बोर्ड ऑफ इरिगेशन अँड पॉवर (सीबीआयपी) या केंद्रीय संस्थेचा प्रतिष्ठेचा 'सीबीआयपी अॅवॉर्ड फॉर बेस्ट परफॉर्मिंग पॉवर डिस्ट्रिब्युशन युटिलिटी' पुरस्कार महावितरणला मिळाला, ही विशेष आनंदाची बाब आहे.

सीबीआयपीतर्फे मला 'अॅवॉर्ड फॉर आउटस्टँडिंग कॉंट्रिब्युशन फॉर डेव्हलपमेंट ऑफ पॉवर सेक्टर' हा पुरस्कार मिळाला. मुंबईतील वेस्ट टेक पुरस्कार सोहळ्यात मला सीएमडी लीडरशीप अॅवॉर्ड २०२५ मिळाला. मला मिळालेल्या पुरस्कारांचे संपूर्ण श्रेय मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम नेतृत्वाला तसेच महावितरणच्या माध्यमातून राज्यातील वीज ग्राहकांची सेवा करणाऱ्या कंपनीच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना आहे. मी सर्वांचा आभारी आहे. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमुळे महावितरणचा सन्मान झाला आहे. ❍❍❍

# अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचा 'सीएमडी लीडरशिप' पुरस्काराने गौरव




▸▸ अभिनेते महेश ठाकूर यांच्या हस्ते सीएमडी लीडरशिप पुरस्कार स्वीकारताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र समवेत श्री अधिकारी ब्रदर्स टेलिव्हिजन नेटवर्कच्या संचालिका कांचन अधिकारी

**गव्हर्नन्स नाऊ** या प्रतिष्ठित नियतकालिकाने देशभरातील ऊर्जा कंपन्यांसाठी आयोजित केलेल्या 'वेस्टेक सिम्पोसियम अँड ॲवॉर्ड २०२५' सोहळ्यात अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना देशभरातील ऊर्जा कंपन्यांमधून सीएमडी लीडरशिप गटातून सर्वोत्कृष्ट अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून मुंबईत गौरविण्यात आले. या पुरस्काराचे श्रेय मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाला आणि कंपनीत कार्यरत ९० हजार कर्मचाऱ्यांना जाते, असे लोकेश चंद्र यांनी सत्कारप्रसंगी बोलताना सांगितले.

महावितरणला सायबर सुरक्षितता आणि डेटा संरक्षण, नव्या तंत्रज्ञानाचा अंगिकार आणि कौशल्य विकासासाठीचा पुढाकार या तीन प्रवर्गात सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार देण्यात आले. कार्यकारी संचालक (वाणिज्य) दिनेश अगरवाल, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान)अविनाश हावरे, मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा) दत्तात्रय बनसोडे, मुख्य अभियंता ( विशेष प्रकल्प) पंकज तगलपल्लेवार, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांनी पुरस्कार स्वीकारले.

# ऊर्जा परिवर्तनासाठी सर्वोत्कृष्ट कामगिरीचा राष्ट्रीय पुरस्कार




▸▸ नवी दिल्ली येथील सोहळ्यात पुरस्कार स्वीकारताना कार्यकारी संचालक (वितरण) दत्तात्रय पडळकर, मुख्य अभियंता संदीप पाटील, अधीक्षक अभियंता नीलकमल चौधरी, अधीक्षक अभियंता संजय वाघमारे.

**मा.मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यात अंमलात येणाऱ्या ऊर्जा परिवर्तन योजनेतील विशेष कार्यासाठी महावितरणला इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे नवी दिल्ली येथे आयोजित केलेल्या तेराव्या ग्रीन एनर्जी समिटमध्ये राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले.

महावितरणला या प्रतिष्ठित परिषदेत 'स्टेट लेव्हल एक्सलन्स ॲवॉर्ड इन एनर्जी ट्रान्झिशन' या गटात पुरस्कार मिळाला. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांच्या मार्गदर्शनात राज्याचा ऊर्जा परिवर्तन आराखडा तयार करण्यात आला आहे. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात ऊर्जा परिवर्तन योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पुरस्कार सोहळ्याचे मुख्य अतिथी म्हणून पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू नियामक मंडळाचे अध्यक्ष अनिलकुमार जैन उपस्थित होते. तसेच ज्युरी मंडळाचे प्रमुख माजी केंद्रीय ऊर्जा सचिव अनिल राजदान उपस्थित होते.

# महापॉवर पे वॉलेटसाठी पुरस्कार



▸▸ पेमेंट सिक्युरिटी समिट अँड ॲवॉर्ड्स इंडिया २०२५ या पुरस्कार सोहळ्यात पुरस्कार स्वीकारताना कार्यकारी संचालक (वित्त) स्वाती व्यवहारे व सहायक महाव्यवस्थापक (वित्त) श्वेता जानोरकर, उप महाव्यवस्थापक सायली जव्हेरी आणि प्रणाली विश्लेषक (माहिती तंत्रज्ञान) स्नेहल चव्हाण

**छोट्या व्यावसायिकांच्या** माध्यमातून वीज ग्राहकांनी ऑनलाईन बिल भरणा करण्यासाठी विकसित केलेल्या महापॉवर पे वॉलेट या सुविधेसाठी पेमेंट सिक्युरिटी समिट अँड ॲवॉर्ड्स इंडिया २०२५ या पुरस्कार सोहळ्यात महावितरणला डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन अचिव्हमेंट पुरस्कार मुंबईत देण्यात आला. या वॉलेटचा वापर करून ग्रामीण भागातील दुकानदार अथवा बचत गट बिल भरणा केंद्राची सेवा वीज ग्राहकांना देऊ शकतात. त्यातून त्यांना कमिशनच्या स्वरुपात उत्पन्नही मिळते. राज्यात प्रामुख्याने ग्रामीण व निमशहरी भागात ४,८७८ महापॉवर पे केंद्रे आहेत. त्याद्वारे दरमहा १३ लाखापेक्षा अधिक ग्राहक वीजबिल भरणा करतात.

# शिवजयंतीच्या निमित्ताने लातूर परिमंडलात रक्तदान शिबिर

**छत्रपती शिवाजी महाराजांना** जयंतीनिमित्त अनोख्या पद्धतीने मानवंदना द्यावी या हेतूने, लातूर परिमंडलात रक्तदान शिबिरात ५२ कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, अधीक्षक अभियंता मदन सांगळे यांनी रक्तदात्या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. शिवजन्मोत्सव समितीचे प्रशांत जाधव, अमोल जाधव, राहुल गाडे, जय सावंत, सोमेश्वर गुजराथी, सुरेश धायगुडे, पवन कदम, अमित शृंगारे, श्रीदेवी सौदागर, बलराम जाधव, श्रीनिवास शिंदे, सचिन सूर्यवंशी, शशांक कुलकर्णी आदींनी परिश्रम घेतले. विलासराव देशमूख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या डॉक्टर्स, तज्ञ कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## राज्याच्या ऊर्जा विभागाचा राष्ट्रीय सन्मान

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला विविध पुरस्कार

## राष्ट्रीय सुवर्ण पुरस्कार



▸▸ अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी स्कोच सुवर्ण राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारला.

**मा.मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी दिवसा वीज पुरवठा व्हावा म्हणून सुरू केलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेला ऊर्जा क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी प्रतिष्ठेचा स्कोच सुवर्ण राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्याचसोबत सौर ग्राम योजनेला स्कोच रजत पुरस्कार मिळाला. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी नवी दिल्ली येथे हे पुरस्कार स्वीकारले.

अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांच्या संयोजनात राज्याचा ऊर्जा विभाग, महावितरण आणि महसूल विभागातर्फे समन्वयाने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे. या योजनेत विकेंद्रित स्वरुपात सौर ऊर्जा निर्मिती करून त्यावर कृषी पंप चालविण्यात येतात. मा. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एप्रिल २०२३ मध्ये ही योजना सुरू झाल्यानंतर गतीने अंमलबजावणी सुरू आहे. मार्च २०२६ पर्यंत ही योजना पुर्ण होईल व राज्यातील सर्व कृषी पंप सौर ऊर्जेवर चालविण्याचे स्वप्न पूर्ण होईल. सौर कृषी पंपासाठी १६ हजार मेगावॅट सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेची ही जगातील सर्वात मोठी विकेंद्रीत सौर ऊर्जा निर्मिती योजना आहे. राज्यात सौर ग्राम योजनेत १०० गावे विकसित करण्यात येत आहेत. सातारा जिल्ह्यातील मान्याचीवाडी हे राज्यातील पहिले सौर ग्राम ठरले आहे. आतापर्यंत सहा गावे सौर ग्राम झाली आहेत.

## माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरासाठी राष्ट्रीय पुरस्कार




▸▸ नवी दिल्ली येथे अकराव्या सार्वजनिक उद्योग पुरस्कार सोहळ्यात पुरस्कार स्वीकारताना अधीक्षक अभियंता (नवीकरणीय ऊर्जा) निखिल मेश्राम.

**मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या अंमलबजावणीत माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केल्याबद्दल महावितरणला गव्हर्नन्स नाऊ या प्रकाशनातर्फे नवी दिल्ली येथे आयोजित अकराव्या सार्वजनिक उद्योग पुरस्कार सोहळ्यात महावितरणला 'एक्सलन्स इन प्रोसेस इनोव्हेशन' आणि 'बेस्ट यूज ऑफ ऑटोमेशन अँड डिजिटल टेक्नॉलॉजीज' या दोन गटात राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले.

## कल्पक ऊर्जा प्रकल्पासाठी डायमंड पुरस्कार



▸▸ अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी हा पुरस्कार स्वीकारला समवेत कार्यकारी संचालक (प्रकल्प) धनंजय औंढेकर

**मा.मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठ्यासाठी राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेसाठी इंडियन स्मार्ट ग्रीड फोरमच्या 'आयएसजीएफ इनोव्हेशन ॲवॉर्ड २०२५' पुरस्कार सोहळ्यात देशातील सर्वाधिक कल्पक ऊर्जा प्रकल्प म्हणून डायमंड पुरस्काराने नवी दिल्ली येथे गौरविण्यात आले. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी कार्यकारी संचालक (प्रकल्प) धनंजय औंढेकर उपस्थित होते.



Printed & Published by Shri. Bharat Pawar of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd. Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011.
& Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001. Tel. : 2261 9100
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : भारत पवार •उपसंपादक : किशोर खोबरे
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता
प्रकाशगड, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)